प्रसिद्धी पत्रक
PRESS NOTE

CITY & INDUSTRIAL DEVELOPMENT CORPORATION OF MAHARASHTRA LTD.
**Regd. Office:** Nirmal, 2nd Floor, Nariman Point, Mumbai 400 021. Tel.: 91-22-6650 0900; FAX:91-22-6650 0933; www.cidcoindia.com
**Head Office:** CIDCO Bhavan, CBD Belapur, Navi Mumbai 400 614. Tel.: 91-22-6791 8241; Fax: 91-22-6791 8294; email: ratambepriya@gmail.com

**दि. १७.०९.२०१९**

## सिडकोतर्फे अर्जदारांना ई-लिलाव प्रक्रियेची माहिती देण्यासाठी १९ सप्टेंबर २०१९ रोजी विशेष मार्गदर्शन सत्राचे आयोजन

सिडको महामंडळातर्फे महामंडळाच्या मालकीच्या भूखंड, दुकाने व कार्यालये यांच्या विक्रीकरिता नव्याने सुरू करण्यात आलेल्या ई-लिलाव (E-auction) प्रक्रियेबद्दल इच्छुक अर्जदारांना मार्गदर्शन करण्यासाठी दि. १९ सप्टेंबर, २०१९ रोजी ७ वा मजला, सिडको सभागृह, सिडको भवन, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई येथे विशेष मार्गदर्शन सत्राचे आयोजन करण्यात आले आहे. नवी मुंबईच्या विविध नोड्मधील महामंडळाच्या गृहनिर्माण योजनांतील रेल्वे स्थानक संकुलांतील दुकाने व कार्यालये आणि निवासी/निवासी+वाणिज्यिक/वाणिज्यिक वापराकरिता असलेल्या भूखंडांच्या विक्रीकरिता यापूर्वी राबविण्यात येणाऱ्या मानवी निविदा प्रक्रिये ऐवजी महामंडळातर्फे ई-लिलाव प्रक्रियेचा अवलंब करण्याचा निर्णय संचालक मंडळाच्या मान्यतेनंतर घेण्यात आला होता. विक्रीची संपूर्ण प्रक्रिया सुरक्षित, पारदर्शक व जलदरीत्या पार पडावी तसेच महामंडळाच्या योजना अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचाव्यात अशा दुहेरी उद्देशाने ई-लिलाव प्रक्रियेचा अवलंब करण्याचा निर्णय घेण्यात आला होता.

ई-लिलाव प्रक्रिये अंतर्गत योजना पुस्तिका ऑलनाईन उपलब्ध करून देण्यात येऊन त्यासाठीचे अर्ज व अनामत रक्कम शुल्क लिलाव प्रक्रिया राबविण्याऱ्या बँकेतर्फे ऑनलाईन स्वीकारण्यात येणार आहे. तसेच अयशस्वी अर्जदारांनी भरलेली अनामत रक्कम बँक खात्यात विशिष्ट कालावधीनंतर आपोआप जमा होणे या सुविधाही याद्वारे उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. यामुळे इच्छुक अर्जदारांना, संपूर्ण प्रक्रिये दरम्यान कोणत्याही टप्प्यावर सिडको कार्यालयामध्ये प्रत्यक्ष येण्याची गरज भासणार नाही. तसेच ई-लिलाव प्रक्रिया ही सुरक्षित, पारदर्शक व जलद असण्याबरोबरच त्यामध्ये अचूकताही येणार आहे.

सिडकोतर्फे नुकत्याच पुष्पक नोड् येथील भूखंड वाणिज्यिक/निवासी+वाणिज्यिक/निवासी व वाशी येथील भूखंड वाणिज्यिक + वर्तमानपत्र छपाई; घणसोली येथील रोहाउस भूखंड आणि नवीन पनवेल (पूर्व आणि पश्चिम) येथील भूखंड निवासी वापराकरिता भाडेपट्ट्यावर उपलब्ध करून देण्याकरिता तीन योजना सुरू करण्यात आल्या आहेत. सदर योजनाही ई-लिलाव प्रक्रियेद्वारे पार पडणार आहेत. याकरिता www.cidco.procure247.com या संकेतस्थळावर ई-लिलाव पोर्टल उपलब्ध करून देण्यात आले आहे.

सदर ई-लिलाव प्रक्रिया ही अर्जदारांच्या दृष्टीने नवीन असल्याने ई-लिलाव पोर्टलच्या वापराबाबत अर्जदारांना मार्गदर्शन करण्याकरिता उपरोल्लेखित तारखेस ७ वा मजला, सिडको सभागृह, सिडको भवन,

सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई येथे मार्गदर्शन सत्राचे आयोजन करण्यात आले आहे. ई-लिलाव पोर्टलविषयक अर्जदारांच्या शंकांचे निरसनही या सत्रा दरम्यान करण्यात येणार आहे. यासाठी इच्छुक अर्जदारांनी दि. १९ सप्टेंबर २०१९ रोजी या सत्रास उपस्थित राहण्याचे आवाहन सिडकोतर्फे करण्यात येत आहे.

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

मा. संपादक महोदय,
वरील बातमीस आपल्या लोकप्रिय वर्तमानपत्रातून ठळक प्रसिद्धि देऊन उपकृत करावे, ही विनंती.

**जनसंपर्क विभाग, सिडको**